**महाराष्ट्र शासन**

अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली जवान पदावर सरळसेवेची विशेष भरतीने रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात

क्रमांक : इएसटी ११२०१९/५४/ड १

मुंबई, दि. २८/०२/२०२०

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१ डिसेंबर, २०१९ अन्वये विहित तरतूदी आणि निर्देशानुसार अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जवान पदाच्या भरतीसाठी ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमूद केल्या वेळापत्रकाप्रमाणे विहीत अर्हताधारक व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सरळसेवा विशेष भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात https://mumbaisuburban.gov.in या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून उमेदवारांनी जाहिरातीत नमूद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून पदनिहाय जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पत्यावर समक्ष सादर करावेत.

अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत | दि.१३/०३/२०२० |
| १. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरती प्रक्रियेची तपशीलवार जाहिरात https://mumbaisuburban.gov.in या संकेत स्थाळवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.<br>२. परीक्षेच्या वेळापत्रकाचा तपशील व ओळखपत्र https://mumbaisuburban.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील. | |

विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जास झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहिम २०१९ अन्वये भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **संवर्गाचे नाव** | **एकूण भरावयाची पदे** | **सर्वसाधारण** | **महिला** (३०%) | **खेळाडू** (५%) | **माजी सैनिक** (१५%) | **प्रकल्पग्रस्त** (५%) | **भूकंपग्रस्त** (२%) | **पदवीधर अंशकालीन कर्मचारी** (१०%) | **अनाथ** (१%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जवान | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | अर्ज सादर करावयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | जवान | ३ | अधीक्षक, राज्य त्पादन शुल्क, तथा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सदस्य सचिव जिल्हा निवड समिती मुंबई उपनगर<br>पत्ता : अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय जुने जकात घर, तळमजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट मुंबई-४०० ०२३. |

टिप : भरती प्रक्रियेमधील एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया /परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार, समांतर आरक्षणात अंशतः बदल करणे, तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड समिती मुंबई उपनगर यांना राहील.

ठिकाण : मुंबई उपनगर

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर
तथा
अध्यक्ष जिल्हा निवड समिती, मुंबई उपनगर

**महाराष्ट्र शासन**

**अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय**

**अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली जवान पदावर सरळसेवेची विशेष भरतीने रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**

**क्रमांक : इएसटी ११२०१९/५४/ड१**

**मुंबई, दि. २८/०२/२०२०**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१ डिसेंबर २०१९ अन्वये विहित तरतुदी आणि निर्देशानुसार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या वर्ग ३ (गट-ड) च्या पदांच्या भरतीकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमुद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे **विहीत अर्हताधारक व अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक** पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.
पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणाचा तपशिल परिच्छेद ४ मधील विवरणपत्रात नमूद केलेप्रमाणे आहेत.

**१) अर्ज करण्याची पध्दत :-**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षेकरीता जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून फक्त ऑफलाईन पध्दतीने कार्यालयीन वेळेत अर्ज स्विकारण्यात येतील. अर्ज https://mumbaisuburban.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. |
| २ | जवान पदांकरीता ऑफलाईन अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक १३/०३/२०२० रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत राहील. |

**सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात** https://mumbaisuburban.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून ऑफलाईन (offline) पध्दतीनेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालय, जुने जकात घर, तळ मजला, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००२३ पत्यावर आपले अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.**

**२) परीक्षा शुल्क :-**

शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्र.प्रानिमं-१२१६/(प्र.क्र.६५/१६)/१३-अ दि.१३/०६/२०१८ मधील परिच्छेद क्र.६ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | १५०/- |
| २ | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. | |

**टिप :** वरील प्रमाणे परीक्षा शुल्क हे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेच्या आणि मुंबई येथे देय असलेल्या रेखाकिंत धनाकर्षाव्दारे (डीमांड ड्राफट) सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे नांवे काढून अर्जासोबत जोडावा व डी.डी.च्या मागे उमेदवाराने स्वत:चे संपूर्ण नांव व पत्ता लिहावा. सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा स्वरुपाचे राहील ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. अर्जासोबत परीक्षा शुल्क डी.डी.स्वरुपात जोडले नसल्यास अगर कमी रक्कमेचा डी.डी. जोडला असल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार,(सामाजिक अथवा समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णत: बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा निवड समिती यांना असतील. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

**३) परीक्षेचे वेळापत्रक :-**

i) अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिनांक:-दि.१३/०३/२०२० रोजी सायं. ६.१५ पर्यंत

ii)लेखी परिक्षेचे ओळखपत्रे निर्गमित करणे :- दि.१८/०३/२०२० सायं. ६.१५ पर्यंत

iii) प्रत्यक्ष लेखी परीक्षा आयोजन :- दि.२२/०३/२०२० रोजी

iv) शारिरीक पात्रता व मैदानी चाचणी :- दि.०३/०४/२०२० रोजी

v) प्रारुप निवड यादीतील उमेदवारांची कागदपत्रे/ :- दि.०७/०४/२०२० पर्यंत

चारित्र्य पडताळणी / वैद्यकीय तपासणी

उमेदवारानी लेखी परिक्षेची ओळखपत्रे https://mumbaisuburban.gov.in या संकेतस्थळ वरुन डाऊनलोड करुन त्यावर अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो चिकटवून तो राजपत्रित अधिकारी यांच्याकडून साक्षांकित करुन घेणे आवश्यक राहील व सदर ओळखपत्र परिक्षेच्यावेळी उमेदवाराने आणने आवश्यक आहे.ओळखपत्राशिवाय उमेदवाराला परीक्षाकेंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. तसेच कोणत्याही उमेदवारांस ओळखपत्र पोष्टाने अगर अन्य मार्गाने पाठविले जाणार नाही.

4) **अ) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे आस्थापनेवरील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली वर्ग ३ (गट-ड) विशेष भरती २०१९ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल**

**अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | एकूण भरावयाची पदे | सर्वसाधारण | महिला (३०%) | खेळाडू (५%) | माजी सैनिक (१५%) | प्रकल्पग्रस्त (५%) | भूकंपग्रस्त (२%) | पदवीधर अंशकालीन कर्मचारी (१०%) | अनाथ (१%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जवान | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |

**टिप :-** १) समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (अपंग व माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळुन)पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड

करण्यात येईल.
२) वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**परिशिष्ठ-अ**

**पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी स्तर | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | जवान | S-६ : १९९००-६३२०० | उमेदवार एस.एस.सी (माध्यमिक शालांत परीक्षा) उत्तीर्ण असणे आवश्यक<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |

**५) वयोमर्यादा** - जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी **दि. २८.०२.२०२०** रोजीचे वय गणण्यात येईल.

| क्र. | पदाचे नाव | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | जवान मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि. २५ एप्रिल, २०१६ मधील तरतूदींनुसार वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>जवान पदांसाठी- उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २ | पदवीधारक/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.अशंका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.२ जानेवारी,२०१९ मधील तरतूदींनुसार कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. |
| ३ | स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी यांचेसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. |
| ४ | खेळाडू उमेदवारांसाठी | शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि. १.७.२०१६ मधील तरतूदींनुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी आवश्यक असलेल्या विहित वयोमर्यादेत ०५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि, उच्चतम वयमर्यादा ४३ इतकी राहील. |
| ५ | प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रकल्प-१००६/मु.स/३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि.३/२/२००७ मधील तरतूदींनुसार, कमाल वयोमर्यादा |

| | | |
|---|---|---|
| | | ४५ वर्ष इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादेबाबत ४५ वर्षापर्यंतची सवलत राहील. |
| ६ | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/८/२०१० मधील तरतूदींनुसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |

**६) <u>परीक्षेचे स्वरुप व दर्जा :-</u>**

**अ.लेखी परीक्षा-**

(शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिमा १२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दि.१३ जून २०१८ नुसार)

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | मराठी संबंधित प्रश्न | | इंग्रजी संबंधित प्रश्न | | सामान्य ज्ञान संबंधित प्रश्न | | बौध्दिक चाचणी संबंधित प्रश्न | | एकूण | | प्रश्न पत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | शालांत परीक्षा |
| १ | जवान | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० | १२० | १२० | |

जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील असे उमेदवार शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी पात्र ठरतील.

**ब. शारिरीक पात्रता व मैदानी चाचणी –**

जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल. लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांनी नायगांव पोलीस मैदान मुंबई येथे दि.३ एप्रिल, २०२० रोजी सकाळी ९.०० वाजता शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी उपस्थित राहायचे आहे.

1. शारिरीक चाचणी.

| **अर्हता** | **पुरष** | **महिला** |
|---|---|---|
| उंची | १६५ सें.मी. (किमान) | १६० से.मी. (किमान) |
| छाती | न फुगविता किमान ७९ सें.मी. (किमान न फुगवून व फुगवून छातीतील किमान प्रसरण ५ सें.मी. आवश्यक) | लागू नाही. |
| वजन | लागू नाही | ५० कि.ग्रॅ. (किमान) |

जे उमेदवार शारिरीक चाचणीत पात्र ठरतील त्याच उमेदवारांची त्याच दिवशी उपरोक्त नमुद ठिकाणी मैदानी चाचणी घेण्यात येईल.

**२. मैदानी चाचणी**

| अ.क्र. | पुरुष | | महिला | |
|---|---|---|---|---|
| | मैदानी चाचणीचा प्रकार | गुण | मैदानी चाचणीचा प्रकार | गुण |
| १ | १.५ कि.मी. धावणे | १६ | १ कि.मी. धावणे | २० |
| २ | १०० मी. धावणे | १६ | १०० मी. धावणे | २० |
| ३ | गोळा फेक | १६ | गोळा फेक (४ किलोचा) | २० |
| ४ | लांब उडी | १६ | लांब उडी | २० |
| ५ | पुलअप्स | १६ | -- | -- |
| एकूण | | ८० | एकूण | ८० |

शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीस उपस्थित राहताना सोबत तसेच लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र व ओळखपत्र (फोटो आयडेंटीटी ) घेवून यावे. उक्त दिवशी उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांची नव्याने शारिरीक पात्रता / मैदानी चाचणी घेण्यासाठी विचार केला जाणार नाही. मैदानावर उपस्थितीची नोंद घेवून त्यांना शाररीक तपासणी व मैदानी परिक्षेसाठी क्रमांक देण्यात येईल. जर त्या दिवशी उपस्थिती असलेल्या उमेदवारांची संख्या जास्त असेल तर त्यांना शारिरीक तपासणी व मैदाणी परिक्षेसाठी पुढील तारीख अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई उपनगर यांचे कार्यालयातील सुचना फलकावर कळविण्यात येईल. ज्या उमेदवारांना शारिरीक तपासणी नंतर मैदानी परिक्षेसाठी पुढील तारीख कळविण्यात येईल त्यांनी त्या दिवशी वेळेवर उपस्थित राहिले पाहिजे. इतर दिवशी उपस्थित राहिल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

लेखी व मैदानी चाचणी यामध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड सुची तयार करून निवड सुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. तथापी, अंतिम गुणवत्ता यादीत अंर्तभाव करण्यासाठी उमेदवराने एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**महत्त्वाच्या अटी व शर्ती :-**

i) जाहिरातीमध्ये नमूद समांतर आरक्षणानुसार महिला, माजीसैनिक, पदवीधर अंशकालीन उमेदवार, खेळाडू, प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार देय असलेल्या सवलती देणेत येतील.

ii) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिमा१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दि.१३ जून २०१८ मधील तरतूदीनुसार, सदरची पदे भरण्यासाठी अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची ही सदर याद्या प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतीसाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधी ग्राहय ठरेल. तद्नंतर ही निवडयादी व प्रतिक्षायादी व्यपगत होईल.

iii) समांतर आरक्षणांतर्गत त्या-त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटप निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरणेत येतील.

iv) सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, परीक्षेच्या कार्यक्रमामध्ये अंशत: बदल करणे तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

v) माजीसैनिकांबाबत Government of India, Ministry of Personnel PG & Pensions (Department Of Personnel & Training) No.३६०३४/५/८५-Estt(SCT), New Delhi दि.२७ ऑक्टोबर,१९८६ च्या राजपत्रानुसार सैनिक दलात कार्यरत असताना ०१ वर्षे अगोदर माजी सैनिक समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे जिल्हा निवड समितीस राहतील.

vi) खेळाडू उमेदवारांसाठी आवश्यक अर्हता- जाहिरातीमध्ये नमूद पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या खेळाडू उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे अर्हता धारण करणे/असणे आवश्यक आहे.

* खेळाडू हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे.

* खेळाडूने सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमातील तरतूदींनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

* खेळाडुंसाठी आरक्षणाबाबत क्रिडाविषयक अर्हता ही शासन निर्णय दि. १ जुलै२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक दि.१० ऑक्टोबर,२०१७ नुसार ग्राह्य धरण्यात येईल. शासन निर्णय दि. १ जुलै, २०१६ मधील तरतुदींनुसार अर्जासोबतच क्रिडा विषयक प्रमाणपत्राची संबंधीत विभागीय उपसंचालक क्रिडा व युवक कल्याण यांचेकडील पडताळणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. वरील शासन निर्णय तसेच दि.१५ नोव्हेंबर, २०१७ च्या शुध्दीपत्रकासोबतच्या परिशिष्टात नमूद क्रिडा प्रकार व योग्यता व अर्हता खेळाडुंनी धारण करणे आवश्यक आहे.

vii) माजी सैनिकांच्या अर्हतेबाबत- पदवी परीक्षा ही पात्रता असलेल्या आणि तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेला नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीग्र असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टीफिकेट एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र असल्यास ते अशा पदांना अर्ज करु शकतात.

**७) <u>परीक्षेचा दर्जा / स्तर</u>**

i) परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

**८) <u>परीक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती</u>**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.प्रनिम-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ दिनांक १३ जून २०१८ नुसार पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१) जवान पदासाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ३० गुण ठेवून एकुण १२० गुणांची ९० मिनीटात लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची राहिल.

२) लेखी परिक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करणारे उमेदवार शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी

पात्र ठरतील.

३) शारिरीक पात्रतेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची ८० गुणांची मैदाणी चाचणी घेण्यात येईल. लेखी परीक्षा व मैदाणी चाचणी यामध्ये उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड सुची तयार करून पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करण्यात येईल. तथापी, अंतिम गुणवत्ता यादीत अंर्तभाव करण्यासाठी उमेदवराने एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**९) <u>निवडसुची व निवडसूचीची कालमर्यादा</u>**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.प्रनिम-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ दिनांक १३ जून २०१८ मधील तरतुदीनुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**१०) <u>समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती</u>**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन पूरकपत्र क्रमांक:प्रानिमं-१२१७/(प्र.क्रं.९२/१७)/१३-अ दिनांक ०२ डिसेंबर,२०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२१६/(प्र.क्रं.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून,२०१८ अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

अ) आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

ब) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल

क) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता(पदव्युत्तर पदवी, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल)

ड) वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**११) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे (छायाकिंत व साक्षाकिंत प्रती.)**

i) **उमेदवाराने त्याच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ शैक्षणिक अर्हता दर्शविणारी कागदपत्रे**, **वयाचा पुरावा**

ii) **अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र**

iii) **अधिवास प्रमाणपत्र** (Domicile Certificate)

iv) माजी सैनिक असलेबाबतचे प्रमाणपत्र (असल्यास)

v) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असलेबाबतचे प्रमाणपत्र (असल्यास)

vi) खेळाडू असलेबाबतचे प्रमाणपत्र (असल्यास)

vii) स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशन प्रमाणपत्र (असल्यास)

viii) अर्ज केलेल्या पदाप्रमाणे पदवीधर / शालांत माध्यमिक/ उत्तीर्ण प्रमाणपत्र व शाळेचा दाखला

ix) अंशकालीन असलेबाबत प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र , नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास)

**१२) <u>सर्वसाधारण सुचना :-</u>**

i) मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य इ. संबंधीची माहिती द्यावी लागेल.

ii) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल.

iii) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

iv) वरील पदासाठी गुणवत्ता यादी ही संपुर्ण राज्यातून प्राप्त होणाऱ्या अर्जातून मुंबई उपनगर जिल्हयासाठी तयार करणेत येईल.

v) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक स्वसाक्षांकित पासपोर्ट साईज रंगीत फोटो लावावा व दोन पासपोर्ट साईज रंगीत फोटो सोबत जोडावे. अर्जावर योग्य त्या ठिकाणी सही करणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र करणेत येईल.

**१३) महत्त्वाच्या सूचना :-**

i) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

ii) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

iii) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे. (a)पॅनकार्ड, (b) पासपोर्ट, (c) वाहन अनुज्ञप्ती (d) मतदार ओळखपत्र (e) फोटोसह राष्ट्रीयकृत बँकपासबुक (f) मूळ आधारकार्ड

iv) उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल

v) उमेदवारांना अर्ज सादर करणे, लेखी परीक्षा, शारिरीक पात्रता व मैदानी चाचणी तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

vi) निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

vii) उमेदवारांची सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल.

viii) निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यावर केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल.

ix) फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज संबंधित कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी व विहीत वेळेनंतर या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

x) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

xi) **उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसलेने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.**

xii) **अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा.** संपर्क वेळ : सकाळी **९.४५** ते सायंकाळी **६.१५** वाजेपर्यंत.

दूरध्वनी क्रमांक : **०२२-२२६६२४०२**

## १४) विशेष सुचना

i) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

ii) माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षीत असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

iii) खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातून सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होऊ शकेल.

iv) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल.

v) लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संबंधित कार्यालयाकडून समक्ष प्राप्त करुन घेता येईल.

vi) सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो.

## १५) समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोट्यातील पदांसाठी अटी व शर्ती :-

### अ) महिला आरक्षण :-

i) महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र. ४१५/ का.२, दि.२५.०५.२००१ मधील तरतदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी तशी मागणी अर्जात करणे अनिवार्य आहे.

ii) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/ २००१/ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५.५.२०११ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६//१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**ब) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडू :-**

१) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ०१ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ ऑक्टोबर,२०१७ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळांडूबाबत आरक्षण क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२) प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत :- खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी सुधारित तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे गुणवत्ता खेळाडू उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडू साठी आरक्षित पदावर शिफारशीसाठी/नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

३) शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे दिनांक १८.०८.२०१६ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार भरती वर्षात त्या-त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सदर आरक्षण इतरत्र उदलाबदल न करता त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**क) माजी सैनिक :-**

१) शासन परिपत्रक साप्रवि क्र. आरटीए १०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करण्यात आले आहे. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए ९०९०/६२/प्र.क्र.२२२/९१/२८ मुंबई दि. ३० डिसेंबर, १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

२) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक ०२/०९/१९८३ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यु झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तिला नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणातून विचार करणेत येईल.

**<u>ड) प्रकल्पग्रस्त :-</u>**

शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम १०८०/३५/१६ अ दिनांक २१.०१.१९८० नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा.जिल्हाधिकारी /जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**<u>इ) भुकंपग्रस्त :-</u>**

शासन निणय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६ अ दिनांक २७.०८.२००९ नुसार भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा.जिल्हाधिकारी /जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**<u>फ) अंशकालीन :-</u>**

शासन निर्णय दि. २७ ऑक्टोबर, २००९ अन्वये पदविधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑफलाईन अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, तसे आढळल्यास कोणत्याही वेळी निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**<u>ग) अनाथ :-</u>**

1) महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०२.०४.२०१८ अन्वये अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर प्रवर्गातून जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्ये एवढे उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

२) आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी अर्ज सादर करतांना तशी नोंद करणे व कागदपत्र पडताळणीच्या वेळी अनाथ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**१६)<u>इतर सर्वसाधारण सुचना</u>**

i) ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. अशा उमेदवारांना कोणत्याही कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

ii) अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन,अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

iii) शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे.

iv) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परिक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

v) निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

vi) चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

vii) निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील.

viii) अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी परीक्षा घेण्यात येईल. याबाबतची माहिती संबंधित कार्यालयाकडून घेण्याची जबाबदारी ही संबंधित उमदेवाराची राहील.

ix) निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल.

x) वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील.

xi) जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

xii) शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधील तरतुदी नुसार परिक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवरांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

**१७) <u>परीक्षेस प्रवेश :-</u>**

१) लेखी परीक्षेकरीता उमेदवाराने केवळ काळया शाहीच्या बॉल पॉईटच्या पेनाचा वापर करणे आवश्यक आहे.

२) प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत तसेच प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी

दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

३) डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रानिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४)परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा निवड समिती, जिल्हा प्रशासन किंवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती, मुंबई उपनगर**